सेवेत पुनःस्थापित करणे बाबत.

श्री. संतोष बाळासाहेब जाधव, सेवा निलंबीत,
कनिष्ठ सहाय्यक, जि.प.सा.बा दक्षिण विभाग,
अहिल्यानगर

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/५५२३/४८६/२०२५
अहिल्यानगर दिनांक ०८/०५/२०२५

वाचा:- १. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.निप्रआ-१११९/प्र.क्र.८६/११-अ दिनांक १४ ऑक्टोबर २०११

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.निप्रआ-१११२/प्र.क्र.८२/११-अ दिनांक २० एप्रिल २०१३

३. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/५५२३/१६०७/२०२३ दिनांक १८/१२/२०२३

४. इकडील दोषारोप पत्र क्र.साप्रवि/आस्था-३/५५२३/९३७/२०२४ दिनांक १३/११/२०२४

५. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.लपा. विभाग जामखेड यांचेकडील पत्र क्र.लपा/आस्था/५२३/२०२४ दिनांक १६/१२/२०२४ समवेत दोषारोप पत्र बजावले बाबत पोहोच

६. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.लपा. विभाग जामखेड यांचेकडील पत्र क्र.लपा/आस्था/४७/२०२४ दिनांक ०३/०२/२०२५ समवेत श्री जाधव यांनी सादर केलेला खुलासा

७. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/५५२३/१५०/२०२५ दिनांक २८/०२/२०२५

८. तहसिलदार आस्थापना,नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील पत्र जा.क्र.मशा/पुनस्था-२०२५ प्र.क्र.२२/ई-८ दिनांक १६/०४/२०२५

ज्या अर्थी श्री संतोष बाळासाहेब जाधव, कनिष्ठ सहाय्यक हे जि.प.सा.बा दक्षिण विभाग, अहिल्यानगर येथे कार्यरत असतांना कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा व गैरवर्तन केलेने त्यांचे वर लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला. श्री जाधव यांनी जिल्हा परिषदेची प्रतिमा मलीन केलेने त्यांना या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक-३ च्या आदेशान्वये त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करणेत आले होते.

ज्याआर्थी सदर प्रकरणी श्री संतोष बाळासाहेब जाधव, सेवानिलंबित कनिष्ठ सहाय्यक यांना संदर्भ क्रमांक ४ नुसार दोषारोप पत्र १ ते ४ बजावणेत येऊन संदर्भ क्रमांक ७ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आलेली आहे.

सबब श्री संतोष बाळासाहेब जाधव, सेवानिलंबित कनिष्ठ सहाय्यक यांना निलंबीत होऊन १ वर्ष ४ महिने इतका कालावधी झालेला असल्याने व मा न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या व विभागीय चौकशीच्या अधिन राहुन मा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडिल संदर्भ क्र ८ च्या आदेशातील नमुद केलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित करण्यात येत आहे.

१. सदर कर्मचा-यास पुर्ननियुक्ती देतांना सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.निप्रआ-१११२/प्र.क्र.८२/११-अ दिनांक २०/०४/२०१३ मधील खालील मार्गदर्शक सुचनांनुसार अकार्यकारी पदावर नियुक्ती द्यावी.

अ) राज्यस्तरीय संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या मुळ महसुली विभाग (Division) व ज्या पदावर कार्यरत असतांना निलंबित केले तो महसुल विभाग वगळुन अन्यत्र अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात यावी.

आ) विभागीय संवर्गातील कर्मचा-यांना पुनःस्थापित करतांना त्यांच्या मुळ जिल्हा व ज्या जिल्हयात कार्यरत असतांना निलंबित केले तो जिल्हा वगळुन अन्य जिल्हयात अकार्यकारी पदावर नियुक्ती द्यावी.

इ) जिल्हा संवर्गीय कर्मचा-यांना पुनःस्थापित करतांना त्यांचा मुळ तालुका व ज्या तालुक्यात कार्यरत असतांना निलंबित केले असेल तो तालुका वगळुन अन्य तालुक्यात अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात यावी.

२. त्यांचे वरील फौजदारी केस सबंधी कामकाजावर त्यांचा दबाव येणार नाही. तसेच त्या विशिष्ठ प्रकरणात त्यांचेवर आरोप ठेवण्यात आले आहे त्या प्रकरणाशी त्यांचा दुरान्वयेही संबधी येणार नाही अशा ठिकाणी नियुक्ती द्यावी.

३. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांचे नियुक्ती आदेशाची प्रत विभागीय आयुक्त नाशिक यांना अग्रेषित करावी.

सबब, श्री संतोष बाळासाहेब जाधव, यांचे संदर्भ क्र.३ नुसार केलेले निलंबन आदेश रद्द करुन त्यांना जिल्हा परिषद सेवेत वर नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन व मा न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या तसेच विभागीय चौकशीच्या अधिन राहुन जिल्हा परिषदे मध्ये कनिष्ठ सहाय्यक (लि) वर्ग-३ या पदावर सामावुन घेवून पंचायत समिती जामखेड येथे अकार्यकारी पदावर नेमणुक करीत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री संतोष बाळासाहेब जाधव, कनिष्ठ सहाय्यक यांचे मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी. व तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश हा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in यासंकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202505090 40078 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 08-05-2025 14:35:32
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

श्री संतोष बाळासाहेब जाधव, सेवानिलंबित कनिष्ठ सहाय्यक, जि.प.लपा उपविभाग जामखेड
द्वारा:- उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि प लपा उपविभाग जामखेड

प्रत:- उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि प लपा उपविभाग जामखेड

२/- सदरचा आदेशा श्री संतोष बाळासाहेब जाधव, सेवानिलंबित कनिष्ठ सहाय्यक यांना बजावणेतत येवून दिनाकिंत स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास विनाविलंब सादर करणेत यावी

सहप्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड

२/- श्री संतोश जाधव हे कनिष्ठ सहाय्यक या पदावर रुजु झालेनंतर त्यांचा रुजु अहवाल इकडेस सादर करावा तसेच श्री जाधव यांना यांना अकार्यकारी पदाचे (आवक-जावक, माहिती अधिकार इ. कार्यासनाचे ज्या कार्यासनाकडे आर्थीक बाबींचा समावेशा असणार नाही असे), कामकाज सोपविणेत येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत:- मा. अध्यक्ष,विभागीय निलंबन आढावा समिती तथा विभागीय आयुक्त यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रत:- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा दक्षिण विभाग, अहिल्यानगर

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर